**● १९३७ साली व्ही. शांताराम यांच्या *दुनिया ना माने* या चित्रपटानंतर त्यांचे बंधू व्ही.
जोडीपैकी बाबुल यांचा *चालीस दिन* हा पहिलाच संगीत दिग्दर्शन प्रयत्न फसला
चित्रपटाद्वारे कमल बारोटने गायिका म्हणून पदार्पण केले ● *बेदर्द जमाना क्या***

दुनिया न माने(१९५९):

१९५०चा *आँखे* मदनमोहनने संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात मुकेशच्या आवाजात मदनमोहनच्या संगीत जीवनाची सुरुवात झाली होती. 'प्रीत लगा के मैने यह फल पाया...' हे या चित्रपटातील मुकेशचे गाणे चांगलेच लोकप्रिय झाले होते. तरीही त्यानंतर १९५७च्या *समंदर* या चित्रपटातील लताबरोबरच्या 'क्या साथ मेरा दोगे इन प्यार की...' या एका गाण्याचा अपवाद वगळता मुकेशचा आवाज मदनमोहनने आपल्या संगीतापासून एकदम दूर ठेवला होता. या काळात राज कपूरची भूमिका असलेल्या *आशियाना*, *धून* या दोन चित्रपटांना त्याने संगीत दिले. मुकेशचा आवाज तेव्हा राज कपूरचा आवाज बनला होता. तरीही मदनमोहनने या चित्रपटात राज कपूरला मुकेशच्या आवाजात नव्हे तर तलत, हेमंतकुमार यांच्या आवाजात गायला लावले होते. पण १९५९च्या *दुनिया न माने* या चित्रपटात मात्र हेमंतकुमारच्या आवाजात गाणाऱ्या प्रदीपकुमारला मुकेशच्या आवाजात गायला लावून प्रदीर्घ कालावधीनंतर मुकेशचा आवाज आपल्या संगीतात त्याने आणला होता. 'हम चल रहे थे, वो चल रहे थे...' या गाण्यात. हे गाणे या चित्रपटात दोन भागात होते. दुसऱ्या भागाचे बोल होते – 'तुम चल रहे है, हम चल रहे है...' या भागात मुकेशबरोबर लताबाईंचा आवाज होता. आणि हे गाणेच या चित्रपटातील सर्वाधिक लोकप्रिय गाणे होते.

मुकेशबरोबर मन्ना डेचा आवाजदेखील या चित्रपटात होता. 'दुनिया न माने हो सकता है...' हे या चित्रपटातील शीर्षक गीत मन्ना डेने गायले होते. मुकेशबरोबर एक गाणे गात असताना लताबाईंनी या चित्रपटातील 'सजना लगन तेरी सोने न दे...' हे गाणे एकटीने गायले होते. तर 'चलो दिलदार वई वई...' हे द्रुतगीतच नृत्यगीत कोरसबरोबर, 'जा रे जा रे अनाडी बलमा...', 'सितारो छुप जाना, नजर न लगाना...' ही या चित्रपटातील दोन गाणी आशाबाईंनी एकटीने गायली होती. तर 'ऐंगन वैगन तली तलेंगन, दुनिया हमारे...' हे उडते गाणे शमशाद बेगम व कोरसबरोबर.

या चित्रपटातील मदनमोहनच्या संगीतातील एकजात सारी गाणी राजेंद्र कृष्णनीच लिहिली होती. शांताराम बापूंचे बंधू छाया लेखक व्ही. अवधूत या चित्रपटाचे दिग्दर्शक होते. १९३७ साली शांताराम बापूंनी दिग्दर्शित केलेल्या एका चित्रपटाचे नाव होते *दुनिया ना माने*. त्यानंतर त्याच नावाच्या एका चित्रपटाचे दिग्दर्शन त्यांच्या बंधूनेदेखील करावे, हा एक गमतीदार योगायोग मानावा लागेल.

चालीस दिन(१९५९):

दुनिया ना माने आजही मुकेशच्या गाण्यासाठी लक्षात आहे. मुकेशच्या गाण्यासाठीच लक्षात असलेला १९५९चा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे तेजनाथ जार यांचा *चालीस दिन*. प्रेमनाथ या चित्रपटाचा नायक होता. आणि *बरसात*, *बादल*, *समंदर*नंतर या चित्रपटात तो पुन्हा मुकेशच्या आवाजात गायला होता. 'दिवाना मस्ताना, मुश्किल भेद मेरा न पाना...' हे त्याने मुकेशच्या आवाजात गायलेल्या या चित्रपटातील गाणे चांगलेच लोकप्रिय ठरले होते. एकट्याने हे गाणे गात असताना मुकेशने या चित्रपटातील 'कहो आ के बहार, करे मेरा सिंगार मुझे प्यार मिला...' हे गाणे आशा भोसलेबरोबर गायले होते. मुकेशबरोबर एक गाणे असताना आशाबाईंनी या चित्रपटातील – 'नसीब होगा मेरा मेहरबा कभी न कभी....' हे एक गाणे मन्ना डेबरोबर गायले होते. पहिले गाणे प्रेमनाथ व शकिला यांच्यावर चित्रित करण्यात आले होते. आणि दुसरे गाणे मारुती, शकीला व शम्मी या तिघांच्यावर. 'देखो ये तारे खोये खोये फुलो में सपने सोये सोये....' हे गाणे आशाबाईंनी या चित्रपटात कोरसबरोबर गायले होते. तर 'धडके दिल दिलदार का भडके शोला प्यार का...', 'बैठे है राह गुजर पर, दिल का दिया जलाये, शायद वो दर्द जाने शायद वो लौट आये...', 'धम चक चक पर्वत, पर्वत डेरा डाल, आँसू की दोन बूंदे लेकर...', 'झुठी मुहब्बत, झुठी अदाए, झुठों से दिल न लगा...' ही चार गाणी एकटीने गायली.



मदनमोहन



मुकेश

कैफी आझमी या चित्रपटाचे गीतकार होते व संगीतकार बाबुल. १९५७ साली बिपीन दत्त यांच्याबरोबर आपली जोडी जमवून बिपीन - बाबुल या नावाने त्यांनी संगीत दिग्दर्शन करायला सुरुवात केली. आणि त्यानंतर *चंदू*, *चालीस घंटे* या चित्रपटांचे संगीत दिग्दर्शन त्यांनी केले. १९५९ साली देखील त्या दोघांनी संगीत दिलेले *बस कंडक्टर*, *जंगल किंग*, *रात के राही* हे चित्रपट पडद्यावर आले. या चित्रपटांच्याबरोबर त्या दोघांच्या जोडीचा शेवट झाला.

त्यानंतर त्या दोघांनी स्वतंत्रपणे आपली वाटचाल सुरू केली. *चालीस दिन* बाबुलनी स्वतंत्रपणे संगीतबद्ध केलेला पहिला चित्रपट. तर *क्या यह बंबई है* बिपीनने स्वतंत्रपणे केलेला पहिला चित्रपट. पण *चालीस दिन*चे यश काही या चित्रपटातील त्यांच्या संगीताला लाभले नाही. यामुळे स्वतंत्रपणे सुरू झालेली त्यांच्या संगीत जीवनाची वाटचाल या एकाच चित्रपटात संपली. बाबुलनी मात्र त्यांच्या तुलनेत बरे यश मिळविले.

ओ तेरा क्या कहना(१९५९):

बिपीन-बाबुल यांची जोडी फुटत असतानाच संगीतकारांची एक नवी जोडी आपल्या चित्रपटात

अवधूत यांनी *दुनिया ना माने* या चित्रपटाचे दिग्दर्शन केले ● बिपीन-बाबुल ● कल्पतरू ऊर्फ के. परवेज दिग्दर्शित *ओ तेरा क्या कहना* या पहिल्याच जानेसाठी कल्याणजींच्या संगीतात प्रथमच मुकेश गायला.

❑ इसाक मुजावर

उदयाला आली. ही जोडी म्हणजे कल्याणजी-आनंदजी यांची. या जोडीपैकी कल्याणजी १९५८च्या *सम्राट चंद्रगुप्त* या चित्रपटापासून कल्याणजी वीरजी शाह या नावाने एकट्याने संगीत देत होते. १९५९ साली देखील याच नावाने त्यांनी *बेदर्द जमाना क्या जाने*, *घर घर की बात*, *ओ तेरा क्या कहना* या तीन चित्रपटांचे संगीत नियोजन एकट्याने केले. आपल्या संगीत जीवनात अनेक नवनव्या गायक-गायिकांना त्यांनी ब्रेक दिला. या ब्रेकची सुरुवात त्यांच्या १९५९च्या *ओ तेरा क्या कहना* या चित्रपटापासून झाली. कमल बारोटचा आवाज या चित्रपटाद्वारेच त्यांनी आपल्या चित्रपट संगीतात सर्वात प्रथम आणला. तिच्या



के. परवेज उर्फ कल्पतरु



भरत व्यास

वडिलांचा आफ्रिकेत व्यापार होता. यामुळे तिचे बालपण आफ्रिकेत गेले. तेथे असताना रेडिओवर ती लताबाईंची गाणी ऐकायची. ती ऐकता ऐकता ती लताबाईंची भक्त बनली. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून आपणदेखील गायिका बनावे असे तिला वाटू लागले. त्यासाठी ती आफ्रिकेहून मुंबईला आली. आणि लताबाईंना भेटली. त्या काळात चित्रपट संगीताच्या वर्तुळात लताबाईंच्या विषयी असा प्रवाद ऐकू यायचा की त्या चित्रपट संगीतात येणाऱ्या नवनव्या गायिकांचा दुस्वास करतात. आणि त्यांना संधी मिळत असेल तर त्यांच्या मार्गात अडथळे निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. पण कमल बारोटला मात्र लताबाईंच्या बाबतीत हा अनुभव आला नाही. त्यांनी कमल बारोटची आस्थेने चौकशी करून कल्याणजींच्याकडे तिच्या नावाची शिफारस केली आणि त्यांच्या शिफारशीमुळेच कल्याणजींनी *ओ तेरा क्या कहना*मध्ये कमल बारोटला सर्वात प्रथम गायनाची संधी मिळाली.

*ओ तेरा क्या कहना*मध्ये कमल बारोटने गायलेल्या पहिल्या गाण्याचे बोल होते 'दिल लेके जाते हो कहाँ, हम तो खडे है यहाँ...' हे गाणे तिने सुबीर सेनबरोबर गायले होते. नंतरच्या काळात महेंद्र कपूरने कल्याणजी-आनंदजींच्या संगीतात अनेक गाणी गायली. त्याचा आवाज *ओ तेरा क्या कहना*मध्येच त्यांच्या संगीतात सर्वात प्रथम ऐकू आला. 'दिल मांगे दिल दे दू जान मांगे जान दे दूं...' या गाण्यात हे गाणे महेंद्र कपूरने या चित्रपटात मन्ना डे व सुमन कल्याणपूर यांच्याबरोबर गायले होते. महेंद्र कपूर व सुमन कल्याणपूर यांच्याबरोबर एक गाणे गात असताना मन्ना डेने या चित्रपटातील 'क्या हमने सोचा था क्या हो गया, हाय बुट पॉलीश...' हे गाणे रफी व कोरसबरोबर गायले होते. 'मैं हू मिस् लाली, कलियो की डाली...' हे उडते गाणे या चित्रपटात सुमन कल्याणपूरच्या आवाजात होते. तर हेलनवर चित्रित करण्यात आलेले. 'मजनू के छिलके चोर है ये दिल के...' हे नृत्यगीत गीता दत्त व कोरसच्या आवाजात होते. 'आ जा जा जा रे दिल को तेरी याद आई...' हे एक गाणे या चित्रपटात लताबाईंनी गायले होते आणि ते फारूख कैसरनी लिहिले होते. 'क्या हमने सोचा था, क्या हो गया...' हे गाणे शोर नियाजींनी 'दिल लेके जाते हो कहाँ...' इंदिवरनी तर 'मजनू के छिलके...' गुलशन बावरांनी.

१९३२चा *चार चक्रम* दोन विनोदी नटांची जोडगोळी जमविणारा आपल्याकडील पहिला विनोदी चित्रपट. त्यानंतर दामुअण्णा - जोग (*लग्न पहावं करून*), दीक्षित - गोप (*पगडी*), दीक्षित - केसरी (*आप की सेवा में*), याकूब - आगा (*बडे भैया*), याकूब - गोप (*पतंगा, सगाई*), आगा - भगवान (*शेक हॅण्ड*) यासारखे दोन विनोदवीरांची जोडी जमविणारे अनेक चित्रपट आपल्याकडे निर्माण झाले. *ओ तेरा क्या कहना* या परंपरेतलाच एक चित्रपट होता. भगवान व मेहमूद या दोन विनोदवीरांची जोडी या चित्रपटातच सर्वात प्रथम जमविण्यात आली.

१९८५च्या *घरद्वार* या चित्रपटानंतर दिग्दर्शक कल्पतरू यांनी काही काळ कौटुंबिक चित्रपटांची एक परंपरा हिंदीत निर्माण केली होती. पूर्वी ते के. परवेज या नावाने दिग्दर्शन करायचे. *ओ तेरा क्या कहना* त्यांनी याच नावाने दिग्दर्शित केला होता. आणि त्यांचा हा पहिलाच चित्रपट होता.

बेदर्द जमाना क्या जाने(१९५९):

*ओ तेरा क्या कहना*बरोबरच कल्याणजींनी कल्याणजी वीरजी शाह या नावाने संगीतबद्ध केलेला १९५९ चा आणखी एक सुरीला चित्रपट म्हणजे *बेदर्द जमाना क्या जाने*. मुकेश अनेक संगीतकारांच्याकडे गायला. पण *जंगली*नंतर शम्मी कपूरी चित्रपटांचे युग येथे सुरू झाल्यावर रफीच्या आवाजाचा वरचष्मा येथे वाढला होता आणि मुकेश एकदम दुर्लक्षित झाला होता. शंकर-जयकिशन यांच्यासारखे संगीतकारदेखील या काळात राज कपूरची भूमिका असलेल्या चित्रपटांचा अपवाद वगळता मुकेशच्या आवाजाला टाळू लागले होते. पण कल्याणजी-आनंदजींनी मात्र मुकेशच्या आवाजाला टाळण्याचा प्रयत्न केला नाही. आपल्या संगीतात त्यांनी मुकेशच्या आवाजाचा शेवटपर्यंत आणि जास्तीत जास्त उपयोग केला.

१९५९च्या *बेदर्द जमाना क्या जाने* या चित्रपटात मुकेश कल्याणजींच्या संगीतात प्रथम गायला. 'नैन है जादुभरे हो गोरी तेरे नैन है जादुभरे...' हे गाणे. हिंदी चित्रपटात पियानोवरील गाण्यांची एक परंपरा आहे. *बेदर्द जमाना क्या जाने*मधील कल्याणजींच्या संगीतातील मुकेशचे गाणे याच परंपरेतील एक गाणे होते. आणि ते अभिनेता सुदेशकुमारवर चित्रित करण्यात आले होते. अशोककुमार एका

जमान्यात आपल्या चित्रपटातील एक गायक नट होता. १९४७च्या *साजन*मध्ये रफीच्या आवाजात गाणे गाऊन त्याने स्वतःचे गाणे थांबवले हे यापूर्वीच मी तुम्हाला सांगितले आहे. त्यानंतर तो रफी, मुकेश, तलत, किशोर, हेमंतकुमार यांच्या आवाजात आपल्या चित्रपटात गात होता. पण १९५७-५८ च्या सुमाराला तो अशा वयाला आला होता की, चित्रपटात तरुण नायक साकार करू शकत नव्हता. १९५६च्या *भाई भाई* या चित्रपटापासून निरुपा रॉयबरोबर आपली जोडी जमवून तो प्रौढ भूमिकांच्याकडे झुकला होता. या प्रौढ भूमिकांत त्याच्या भूमिका गीत विरहीत बनू लागल्या होत्या. तरीही *बेदर्द जमाना क्या जाने* या चित्रपटातील रफी व लता यांनी गायलेली 'मै यहाँ तू कहाँ मेरा दिल तुझे पुकारे झुकी झुकी है नजर...' व 'क्यू मिले तुम हम बेवफा ओ सनम, लुट गई जिंदगी क्या खुशी क्या गम...' ही दोन गाणी अशोककुमार व निरुपा रॉय या दोघांचं वय विसरून त्यांच्यावर चित्रित करण्यात आली होती. या दोन गाण्यांपैकी 'मै यहाँ तू कहाँ...' या गाण्यात त्या दोघांनी बागेत एकमेकांमागे धावत केलेली धावपळ तर एकदम केविलवाणी वाटत होती. अशोककुमार व निरुपा रॉय यांच्या जोडीने अनेक चित्रपटांत एकत्र भूमिका केली. पण *बेदर्द जमाना क्या जाने*च्या आधी व नंतर गाण्यातील अशी केविलवाणी धावपळ त्या दोघांना कधी करावी लागली असेल, असे वाटत नाही. लता व रफी यांना गायलेले 'दूर कही तू चल, दिल रहा है मचल, प्यार की राहो में प्रीत की छावो में...' हे आणखी एक गाणे या चित्रपटात होते. आणि ते सुदेशकुमार व जब्बीन यांच्यावर चित्रित करण्यात आले होते.

लताबाईंबरोबर तीन गाणी गात असताना रफीने या चित्रपटातील 'ओ बचके उंची ऐडी वालो ने, कटे कटे बालों ने...' हे गाणे गीता दत्तबरोबर गायले होते. तर 'लकडी जल कोयला भई बेदर्द जमाना क्या जाने...' हे शीर्षक गीत कोरसबरोबर. 'कैद में है बुलबुल सैयाद मुस्कुराए...' हे या चित्रपटातील एक गाणे लताबाईंनी एकटीने गायले होते. आणि ते जब्बीनवर चित्रित करण्यात आले होते. या गाण्याने मुकेशच्या 'नैना है जादुभरे...' या गाण्याइतकीच लोकप्रियता मिळवली होती.

या चित्रपटाची एकजात सारी गाणी भरत व्यासनी लिहिली होती.

कहना तो है

राजेश रोशन यांनी संगीतबद्ध केलेल्या नॉनफिल्मी गाण्यांना कुमार शानू यांनी गायलं आहे. देव कोहली, इब्राहिम अश्क, विजय अकेला यांनी येथे गीतलेखन केलं आहे. चित्रपटापेक्षा नॉन फिल्मी गीतात अधिक स्वतंत्रता प्रत्येकाच्या वाट्याला येते.

आठ गाण्यांपैकी पाच गाणी खूपच सुंदर आहेत. टायटल गीत 'कहना है कैसे कहू...' हे गाणं प्रेमी जीवांची तगमग दर्शवते. या तालात ताजगी आहे. 'साथी मेरे जीना है...' या गाण्यात संगीतकार स्वतः हरवलेला दिसून येतो. सुरापेक्षा ताल फिका आहे. 'सुन हसीना सुन...' या गाण्यात बॅकग्राउन्ड म्युझिक प्रभावशाली आहे. त्यामुळे सुरांची कमकुवत बांधणी लक्षात येत नाही. इब्राहिम अश्क लिखित 'आओं तुम्हे...' मध्ये ओ. पी. नय्यर यांचा पगडा दिसून येतो. 'अपने ख्वाबों...' मध्ये १९६०च्या प्रसिद्ध चित्रपटगीताचे मिश्रण आहे. विजय अकेला लिखित 'धीरे धीरे...'मध्ये आर. डी. बर्मन शैली दिसून येते. जी त्या गीताला अधिक प्रभावशाली करते. कुमार शानूबरोबर कविता नलवा नावाच्या सहगायिकेने साथ दिली आहे.

दमन

ईशान्य भारतातील लोककला आणि लोकसंगीतासाठी प्रसिद्ध असलेले भूपेन हजारिका गायक संगीतकार म्हणून नॅशनल अॅवॉर्डद्वारे भारतभर प्रसिद्ध आहेत. कल्पना लाझमी दिग्दर्शित *दमन* या चित्रपटाद्वारे ते हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश करत आहेत. आसामच्या लोकसंगीताची साधना त्यांच्या प्रत्येक गीत-संगीतात पडसाद उमटवते त्यासाठी त्यांना डॉक्टरेट पदवीसुद्धा मिळाली आहे. येथे माया गोविंद यांच्या गीतांना त्यांनी स्वरबद्ध केलं आहे. मायाजींनी भूपेनदांच्या सुपरहिट आसामी लोकगीतासाठी हिंदी रूपांतर केलं आहे. ते गीत एकदा डॉक्टर भूपेन यांनी तर दुसऱ्यांदा कविता कृष्णमूर्ती यांनी गायलं आहे. एकूण आठ गाण्यांपैकी ही दोन गाणी वगळता एक गाणं शक्तीपूजेचे आहे. प्रत्येक गाण्यात आसामच्या लोकसंगीताची पार्श्वभूमी आणि अजबच्या शांतीचा अनुभव येतो. परंतु आजकालच्या फार्स्ट वेस्टर्न गाण्यांमध्ये या संगीताला किती वाव मिळेल ते सांगू शकत नाही.

जसपिंदर नरुलाच्या आवाजात सप्तशर्षी चंडीपाठ श्लोक आहे. जसपिंदर आणि हेमा सरदेसाईकडून भूपेनदांनी चांगलं काम करवून घेतलं आहे. अलका याज्ञिकने गायलेलं 'सुन सुन गोरिया...' हे नृत्यगीत ऐकणाऱ्याच्या चित्तात पहाडी लोकसंगीताची आठवण जागृत होईल.

मधुमती या चित्रपटात सलील चौधरी यांनी एक बिच्छू गीत सादर केलं होतं. येथे बिच्छू गीत नाही. परंतु नाभीमधून उमटलेला पुरुष आवाज समूहाचा पार्श्वसंगीत म्हणून उपयोग केला आहे. मूळ गीत हेमा सरदेसाईच्या आवाजात आहे, 'सर सर हवाए...' हे गीत पुन्हा रिपीट होते. यानंतरचे 'गुमसुम...' हे गीत एकदा कविताच्या आवाजात तर दुसऱ्यांदा भूपेन हजारिकाच्या स्वरात आहे. या गाण्याद्वारे खोल उदासीनतेची भावना, निर्जनतेची आठवण होते. आसामी गीताचे हिंदी रूपांतर असलेल्या या गीताचा गाभा करुणरसवर आधारित आहे.

एक मजेदार लव्हसाँग डॉमनिक आणि शानच्या आवाजात आहे, 'बहार ही बहार है...' या प्रणयगीतात, तालात मर्यादा अनुभवास येते. असंच एक प्रणयगीत कविता आणि इशाने गायलं आहे, 'पागल पवन चले...' संगीतप्रेमीं-साठी ही ध्वनिमुद्रिका स्वादिष्ट मेजवानीप्रमाणे आहे. परंतु बाजारात ती किती व्यवसाय करणार ते कोण जाणे.

□ सरोज पोपट

एचएमव्हीवर व्हॅलन्टाईन स्पेशल

व्हॅलन्टाईन डेच्या निमित्ताने एचएमव्हीने *ओन्ली लव्ह* नावाची ध्वनिफीत दोन भागांत, चार विभाग करून सादर केली आहे.

व्हॉल्यूम-I मध्ये पहली मुलाकात सदरात एक अजनबी हसीना, लुटे कोयी मन, मैं शायर तो, ना बोले तुम, बाहों में चले, ये नैना ये, अरे जाने कैसे कब कहा ही पहिल्या भेटीची गाणी आहेत. तर *शरारते*मध्ये प्यार कर लिया तों, ये लडकी हायें, चुरालीया है, ओ साथी चल, जलता है जीया, किसी पे दिल अगर, क्या खुब लगती हो ही खट्याळ गाणी आहेत.

व्हॉल्यूम-II मध्ये हसीन लम्हे सदरात करवटे बदलते, गुम है किसी के, तुम बीन जाऊ, आज से पहले, ओ हन्सिनी, आखों मे हमने, 'तू जो मेरे सूर में तर कुछ यादगार पल सदरात मेरे रंग मे, आप की आँखों में, दो लब्जो की है, नीला आसमाँ सो, रीम झिम गिरे, ये कहाँ आ गये हम ही गाणी आपल्या व्हॅलेन्टाईनला धुंद करण्यासाठी अगदी परफेक्ट भेट आहे.

□ हर्षदा